# अधिसूचना

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:१८/०६/२०१५.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८

क्रमांक:एमएसए-०६/२०१५/प्र.क्र.१३६/कामगार-१०, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मुंबई एकोणऐंशी) (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) च्या कलम ६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व कामगार आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या क्रमांक दुकाने/मुंदवआ/निलंबन/२०१५/कार्यासन-१३,दि.०३/१२/२०१४च्या अधिसूचनेतील मुद्दा क्र.१० अधिक्रमित करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे, उक्त अधिनियमाच्या कलम १०(१), ११(१)(अ), १६, १८, १९(१) व २३ खालील तरतुदी राज्यात रमजान या सणाच्या कालावधीत दि.१७/०६/२०१५ ते १७/०७/२०१५ या कालावधीकरीता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून स्थगित करीत आहे :-

१. उक्त अधिनियमातील कलम १०(१), ११(१)(अ), १६, १८, १९(१) व २३ या कलमांखालील तरतुदी या दि.१७/०६/२०१५ ते १७/०७/२०१५ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीसाठी स्थगित राहतील.

२. कोणत्याही कामगारास उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये विहित केलेल्या कामाच्या तासापेक्षा अधिक वेळ काम करणे भाग पडल्यास,
   (अ) त्याची विहित नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात यावी, आणि
   (ब) अतिकालिक कामाबद्दलचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी नसावा.

३. दुकाने, रेस्टॉरंट, खाद्यगृहे आणि निवासी हॉटेल्समधील कामाचे तास कोणत्याही दिवशी १४ तासापेक्षा अधिक असणार नाहीत.

४. विहित साप्ताहिक सुट्टयांचा लाभ न मिळाल्यास,
   (अ) प्रत्येक कामगारास त्याबदल्यात वर नमुद स्थगित कालावधी संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत तेवढयाच बदली रजा देण्यात येतील, आणि
   (ब) प्रत्येक कामगारास उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये विहित केलेल्या दरापेक्षा कमी नसेल अशा दराने सुट्टयांच्या दिवशी केलेल्या कामाबद्दल अतिकालिक वेतन देण्यात येईल.

५. दुकाने, रेस्टॉरंट, खाद्यगृहे आणि निवासी हॉटेल यांना दिवसातील कोणतेही १४ तास त्यांची आस्थापना उघडी ठेवण्याचे स्वातंत्र्य असेल.

६. कोणत्याही महिला कामगारास रात्रौ ९.३० वा.नंतर काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही.

७. उक्त अधिनियमाच्या कलम २(३३) मध्ये विहित केलेल्या कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीस सायंकाळी ७.०० वा.नंतर काम करण्यास फर्माविण्यात येणार नाही.

८. प्रत्येक कामगारास सलग ५ तास काम केल्यानंतर १ तासाची विश्रांती देण्यात येईल.

९. वरील अटी व शर्तींव्यतिरिक्त अधिनियमातील इतर तरतुदी यथास्थिती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रविण गायकवाड)
कार्यासन अधिकारी

महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र भाग-१ एल मध्ये दिनांक १८ /०६/२०१५ मध्ये मुद्रित करण्यासाठी रवाना या अधिसूचनेच्या २० प्रती शासनास सादर कराव्यात व त्याच्या २० प्रती कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर अधिसूचना व त्याचे इंग्रजी भाषांतर शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी सहसचिव (कामगार) यांनी मान्यता दिलेली आहे.

(प्रविण गायकवाड)
कार्यासन अधिकारी

प्रत माहितीसाठी :-

१) कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, मुंबई-५१.
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,महानगरपालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.
३) निवडनस्ती (कामगार-१०)

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy & Labour Department No. MSA-06/2015/CR136/Lab-10, dated 18/06/2015 is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra

(Balasaheb Kolase)
Joint Secretary to Government 17/6/15

**NOTIFICATION**

Industries, Energy & Labour Department,
Mantralaya, Mumbai – 400 032.
Date: 18 / 06/2015.

**Maharashtra Shops and Establishment Act, 1948**

No. MSA-06/2015/CR136/Lab-10. In exercise of the powers conferred by Section 6 of the Maharashtra Shops and Establishment Act, 1948 (Bom.LXXIX of 1948), hereinafter referred to as the said Act, and in suppression of point no.8 of the notification issued by Commissioner of Labour, vide No.Shops/BSAE/Suspend/2015/Karyasan-13, dated 03/12/2014, the Government of Maharashtra hereby suspends the operation of provisions of Sections 10 (1), 11(1)(a), 16, 18, 19(1) & 23 of the said Act for the state of Maharashtra on account of the festivals,i.e.Ramjan for period from 17/06/2015 to 17/07/2015 subject to the following terms and conditions.

1. The suspension of provisions of Sections 10 (1), 11(1)(a), 16, 18, 19(1) & 23 of the said Act shall remain in operation for the period from 17/06/2015 to 17/07/2015 (including both days)
2. If any employee is made to work more than the usual working hours as specified in Section 63 of the said Act,
   (a) It must be noted in prescribed register, and
   (b) Rates of wages for overtime work shall not be less than the rates fixed under Section 63 of the said Act.



o/c

3. Working hours of the shops, restaurants, eating houses and residential hotels on any day should not exceed 14 hours.
4. If benefit of weekly holiday is not available,
   (a) Compensatory holiday shall be given within 3 months from the end of above festival day, and
   (b) Overtime for the working done on a holiday shall be paid as per the rates fixed under Section 63 of the said Act.
5. Shops, restaurants, eating houses and residential hotels shall be free to remain open for any 14 hours of the day.
6. No woman shall be required or allowed to work after 9.30 P.M.
7. No young person as defined in Section 2 (33) of the said Act shall be required or allowed to work after 7.00 P.M.
8. Every employee should be given a rest period of 1 hour after 5 hours of continuous work.
9. Other than these terms and conditions, all the provisions of this Act shall applicable to the establishment.

By order and in the name of the Governor of Maharashtra

(Pravin Gaikwad)
Section Officer

To be published in the Maharashtra Government Gazette, Part I-L. Extra Ordinary, dated 18/06/2015 and to be returned with 20 copies to Government and 20 copies of the print may be sent to the Commissioner of Labour, Mumbai, directly.

(Pravin Gaikwad)
Section Officer

**Copy to :**

1. The Commissioner of Labour, Kamgar Bhavan, Bandra Kurla Complex, Mumbai.
2. The Commissioner, Municipal Corporation of Greater Mumbai, Mahanagarpalika Marg, Mumbai.400 001.
3. Select File (Lab-10)

C:\SIDDHI_1111\BSE\notification\BSE_2015\notification_festival_ramjan_english_2015.doc